महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**क्रमांक :** 1442(2)(3)/2022/ तेवीस **बैठक क्रमांक :** **दिनांक :** 20 जानेवारी, 2025

**प्रति ,**

**PATIL MAYURI TUKARAM (004036202320082300001004)**

**विषय :- महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब मुख्य परीक्षा-2022 पोलीस उपनिरीक्षक या संवर्गाच्या शिफारशीबाबत.**

महोदय /महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास असे कळविण्यात येते की, महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब मुख्य परीक्षा-2022 पोलीस उपनिरीक्षक या परीक्षेच्या दिनांक 10 जानेवारी, 2025 रोजी जाहीर झालेल्या अंतिम निकालानुसार आपली पोलीस उपनिरीक्षक, अराजपत्रित, गट-ब या संवर्गाकरीता अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र शासन, गृह विभाग (पोल-5-अ), हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - 400032 यांचेकडे शिफारस करण्यात येत आहे.

2. आपण अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने विहित वयोमर्यादा, विहित केलेली आवश्यक शैक्षणिक अर्हता, मराठीचे ज्ञान, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (NCL Certificate) तसेच, सामाजिक व समांतर आरक्षण विषयक दावे आपल्या मूळ प्रमाणपत्रांआधारे तपासले असून सदर दावे प्रस्तुत पदाच्या जाहिरातीतील व अधिसूचनेतील तरतूदींच्या अनुषंगाने नियुक्तीपूर्वी शासनाच्या विहित/सक्षम प्राधिका-यांकडून मूळ प्रमाणपत्रांआधारे त्यांची वैधता/सत्यासत्यता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, प्रस्तुत निकालाआधारे आपली शासनाकडे शिफारस करण्यात येत आहे. सदर तपासणीत तसेच ओळखपत्र पडताळणीत पात्र ठरल्यासच आपणांस विषयांकित पदावर नियुक्ती देण्यात येईल. आपण आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता न केल्यास, शासन स्तरावर अधिसूचनेतील तरतूदीनुसार मूळ कागदपत्रांच्या आधारे दावे तपासतांना व अन्य कारणामुळे अपात्र ठरल्यास आपली उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

3. अत्युच्च प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडू पदावर शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या शिफारशी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शासन निर्णय क्रमांक : राक्रीधो-2002/प्र.क्र.68/क्रीयुसे-2, दिनांक 1 जुलै, 2016 रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिद्ध करण्यात आलेल्या शासन शुद्धीपत्रक क्रमांक राक्रीधो-2002/ प्र.क्र.68/क्रीयुसे-2, दिनांक 18 ऑगस्ट, 2016, तसेच शासन शुद्धीपत्रक क्रमांक राक्रीधो-2002/ प्र.क्र.68/क्रीयुसे-2,दिनांक 11 मार्च, 2019 व दिनांक 24 ऑक्टोबर, 2019 रोजीच्या शुद्धीपत्रकातील तरतूदीनुसार आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित गट-ब (अराजपत्रित) पदासाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबत, पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांकाचे म्हणजेच दिनांक 15 जुलै, 2022 रोजीचे किंवा तत्पूर्वीचे क्रीडा प्रमाणपत्र शासनास नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक राहील. तसेच पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा यांच्याकडे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज सादर करणे व त्यासंदर्भातील उक्त दिनांकाची किंवा तत्पूर्वीची पोचपावती शासनास नियुक्तीपूर्वी सादर करणे बंधनकारक आहे. तसेच खेळाडू उमेदवारांनी अर्जात दावा केलेल्या त्यांच्या क्रीडाविषयक प्रमाणपत्राचा संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा यांनी प्रमाणित केलेला क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल नियुक्तीपूर्वी शासनास सादर करणे अनिवार्य राहील.

4. वयोमर्यादेत सवलत घेतलेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरिता विचार शासनाच्या धोरणात्मक निर्णयाच्या अधीन राहून विषयांकित परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे.

5. अर्जामध्ये खोटे/ चूकीचे दावे करणे, सत्य माहिती दडविणे या अत्यंत गंभीर बाबी आहेत. या संदर्भात आपले लक्ष उमेदवारांच्या सर्वसाधारण सूचना व आपण सदर परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जातील प्रतिज्ञापत्राकडे वेधण्यात येत आहे.

6. साक्षांकन नमुना आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर साक्षांकन नमूना डाऊनलोड करुन घेण्यात यावा व संपूर्ण भरुन तो अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र शासन, गृह विभाग (पोल-5-अ), हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई- 400032 यांचेकडे तात्काळ पाठवावा. साक्षांकन नमुन्यातील रकाना क्रमांक – 15(1) मध्ये स्थानबद्धता, अटक, शिक्षा, दंड व इतर काही कारवाई झाली असल्याबद्दलची माहिती होय किंवा नाही या उत्तराने भरावी. संबंधित रकाना कोरा ठेवल्यास किंवा नुसती रेघ मारल्यास असा नमुना स्वीकारण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

7. नियुक्ती संदर्भातील पुढील सर्व पत्रव्यवहार उपरोक्त नियुक्ती प्राधिका-यांकडेच करण्यात यावा.

**आपला विश्वासू ,**

**(वि.शं.देशमुख)**
**उप सचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,नवी मुंबई**